International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.455
Volume 3, Issue 2, April-June 2023 ID: IJCRTA000075 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# "छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी: एक ऐतिहासिक अध्ययन (इसवी सन १६३० ते १६८०)


## सूर्यवंशी दिनेश दत्तात्रय

**लेखक संलग्नता:**
पीएच.डी संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.


**लेख संदर्भ:**
सूर्यवंशी, दि.द.(2023), छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी: एक ऐतिहासिक अध्ययन (1630-1680). International journal or classified research techniques and advance (IJCRTA) ISSN: 2583-1801, 3(2), 36-39.icrta.org

**सारांश:**

छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था अतिशय प्रभावशाली होती. राजकारण आणि समाजकारण यांचा योग्य मेळ घालून महाराजांनी कृतिशील व्यवस्थापन स्वराज्यामध्ये लागू केले होते.

छत्रपती शिवाजी महाराज शककर्ते झाले. गर्विष्ठ माना रायगडा समोर झुकल्या. स्वातंत्र्याच्या आकांक्षा देशाचा स्वाभिमान सिंहासनाधी पर झाला. तो दिवस निश्चितच शिवरायांचा राज्याभिषेकाचा! मात्र त्याचे महत्त्व तितकेच मर्यादित नाही. पराभवांनी खचलेल्या अपमानित राष्ट्र जीवनावर सार्वभौमत्वाचे छत्र चामर चढवणारे एका राज्यसंस्थेचा जन्मही याच दिवशी झाला होता.

**संकेत शब्द:** छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी, मुलकी प्रशासन, लष्करी, राज्यकारभारातील, गुप्तहेर, इत्यादी.

**प्रस्तावना:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे प्रशासन व्यवस्था चालवणारी एक राज्यव्यवस्था जन्माला घातली. केवळ शत्रूला पराजित करण्याचा, गेलेला मुलुख परत मिळवण्याचा ,किल्ले जिंकण्याचा हा संघर्ष नव्हता. शिवाजी महाराजांचा जीवन संग्राम हा शतकांची पारतंत्र घालवणारा एक स्वातंत्र्यलढा आहे. शिवकालीन लोकप्रशासनाच्या पाऊलखुणा आजही त्यांची ग्वाही देतात.

**शिलेदार संकल्पना:**

"पराक्रमाची जिद्द बाळगणारा गडी ज्याकडे स्वतःच्या मालकीचा घोडा हथियार आणि फौज असे त्यास शिलेदार असे म्हणतात."[1]

**भूमिका:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नजरेतून स्वराज्याचे स्वप्न पाहणारे असंख्य लोक होते. त्यापैकी एक म्हणजे असंख्य शीलेदार. जे स्वतःचा व्यवसाय, उद्योग करून स्वतःच्या स्वराज्यासाठी चाकरी करण्याची इच्छा राखत. शिलेदार हा राज्याचा कायमस्वरूपी नोकर नसून, स्वतंत्र अस्तित्व राखणारा तात्पुरता सैन्याचा भाग होता. शिलेदराकडे स्वतःची हत्यारबंद फौज असे. ज्याचा खर्च तो स्वतः त्याच्या खिशातून करत. शिलेदारांच्या

समूहाला पथक म्हणून संबोधले. मात्र जर का सरकारकडून पथकाच्या खर्च करता रोख रक्कम देण्यात आली, तर त्या पथकाला "इत्तलाखी"पथक म्हणून संबोधले जाई.

**विषय निवडीचा हेतू:**
प्रस्तुत विषयामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची मुलकी प्रशासन, लष्करी प्रशासन, राज्यकारभारातील, गुप्तहेर व्यवस्थेतील कामगिरीचा अभ्यास करणे हा या संशोधन कार्याचा हेतू आहे.

**संशोधनाची गृहितके:**
1) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कामगिरीचे महत्त्वाचे योगदान दिसून येते.
2) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुलगी प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कार्यातून ते यशस्वी झाल्याचे निदर्शनास येते.
3) छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी प्रशासन व्यवस्थेत शिलेदारांच्या कार्याचे महत्त्व दिसून येते.
4) छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुप्तहेर व्यवस्थेतील शिलेदारांच्या कार्याचे महत्त्व दिसून येते.

**संशोधन पद्धती:**
प्रस्तुत संशोधनाकरिता समाजशास्त्रीय, विश्लेषणात्मक आणि चरित्रात्मक विश्लेषण या पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. या संशोधन कार्यासाठी प्राथमिक व द्वितीय माहितीचा वापर करण्यात येणार आहे. तसेच मासिके ,वृत्तपत्रे व इंटरनेटचा आधारही घेतला जाईल.

**"छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी: एक ऐतिहासिक अध्ययन " (1630 ते 1680)**

**1) छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिलेदारांच्या कामगिरीचा अभ्यास:**
छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म 19 फेब्रुवारी 1630 रोजी शिवनेरी किल्ल्यावर झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे बालपण अतिशय अस्थिरतेत आणि धामधुमीत गेले. आदिलशहातील कार असताना कंटाळून शहाजीराजांनी निजामशाहीची नोकरी पुन्हा पत्करली. परंतु निजामशाही सुद्धा कटकार असताना पासून मुक्त नव्हती. याच कारस्थानामुळे जिजाबाईंचे वडील लखुजी जाधवराव यांचा भर दरबार खून करण्यात आला होता. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या वेळी शहाजीराजे निजामशाहीच्या वतीने खानदेशात लढण्यात गुंतले होते. शिवाजी महाराजांची चरित्र घडविण्यात शिवाजी महाराजांची आई जिजाबाई आणि दादोजी कोंडदेव यांचा बराच मोठा वाटा होता. यापैकी दादोजी कोंडदेव हा अतिशय प्रामाणिक ,कार्यक्षम आणि कर्तबगार प्रशासक होता. त्यानेच शिवाजी महाराजांना राज्यकारभारात वाकबगार बनवले.[2]

शिवाजी महाराजांच्या लष्करी धोरणांचा विचार करताना ठळकपणे लक्षात येणारी गोष्ट म्हणजे त्यांची योजनाबद्धता अभ्यास स्मरण तर्क निरीक्षण आणि काळ काम वेगाचा प्रमाणबद्ध विवेक धरून अगदी काटेकोरपणे योजना करावी ती महाराजांनी! उत्कृष्ट योजना म्हणजे निम्मे यश, आधीच ती योजना करत. योजनेची आखणी देखील पूर्वनियोजितच असते".[3] यावरून आपल्याला शिवाजी महाराजांच्या शिलेदारांचे योगदान समजून घेता येते. यामध्ये प्रतापराव गुजर नेताजी पालकर, बाळाजी आवजी चिटणीस, बाजीप्रभू देशपांडे ,जीवा महाला, दादोजी कोंडदेव अशा शिलेदारांचा प्रामुख्याने करता येईल.

**2) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील मुलकी प्रशासन व्यवस्थेची कामगिरी**:
"राज्याला प्रमुख उत्पन्न महसुलापासून मिळत असे. महसूल व्यवस्थेत शिवाजी महाराजांनी अमुलाग्र बदल घडवून महसुलाचे उत्पन्न वाढवले. जमीनदारी पद्धती नष्ट करून त्या ठिकाणी रयतवारी पद्धती सुरू केली. पूर्वी पाटील ,कुलकर्णी हे महसूल वसुलीचे काम करीत. ते काम त्यांच्याकडे वंशपरंपरेने चालत आले

होते. हे अधिकारी रयतेवर अत्याचार करीत. आणि दुष्काळ पडला तरीही त्यांची वसुली थांबत नसे. शिवाजी महाराजांनी मलिक अंबर याने अमलात आणलेली महसूल व्यवस्था ही आदर्श म्हणून समोर ठेवली होती. परंतु त्यांनी ती जशीच्या तशी अमलात आली नाही. महसूल व्यवस्थेतील वसूल कार्यातील अन्याय दूर करण्याकरिता म्हणून त्यांनी जबाबदारीचे तत्व अंमलात आणले. जमीन मोजण्यासाठी यापूर्वी दोर अथवा साखळी याचा वापर केला जाई. शिवाजी महाराजांनी राज्यात एक विशिष्ट लांबी असणारी काठी हे परिमाण वापरात आणले.( जसे पाच हाताची एक काठी, 20/20 काठ्या म्हणजे एक बिघा.) जमिनीच्या एकंदर उत्पन्नाच्या 2/5 भाग म्हणजे शिक्षा म्हणून देण्यात येई. हा दर जरी आज जास्त वाटत असला तरीही तो त्याकाळी कमीच होता. बी बियाणे घेण्याकरता सरकारकडून कर्ज मिळण्याची सोय होती. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत महसूल व शेती या दोन बाबी सुधारल्या. इंग्रजी इतिहासकार यांनी याबाबतीत शिवाजी महाराजांचे गुणगान केलेले आढळते.[4] प्रस्तुत प्रकरणात या सर्वांचा आढावा घेतला जाईल.

**3) छत्रपती शिवाजी महाराजांच्या लष्करी प्रशासनातील शिलेदारांची कामगिरी:**

शिवाजी महाराजांनी उत्तम दर्जाची लष्करी व्यवस्था उभारली. सरंजामशाही लष्करी व्यवस्थेचा त्याग करून शिवाजी महाराजांनी स्वतःची नवीन लष्कर व्यवस्था उभारली. त्याच्या संरक्षणासाठी महाराजांनी एक खास संरक्षक दल उभारले. त्याचे महत्त्वाचे तीन भाग होते. किल्ले, पायदळ, घोडदळ.

छत्रपती शिवाजी महाराजांचे जिवाभावाचे सवंगडी त्यांच्या धैर्य शौर्य व आत्मसमर्पणाने मराठी माणसाला माहीत झालेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बरोबरच हिंदवी स्वराज्याची प्रतिज्ञा करून अनेक लढवय्ये धारातीर्थी पतन पावले. महाराष्ट्राच्या परदास्य विमोचनाची महान कामगिरी ह्या सवंगड्यांनी घरदार शेतीवाडी इतकेच नव्हे तर प्रसंगी प्राण अर्पणही केले. देहाचा बळी दिला .स्वतःच्या रक्ताचा अभिषेक केला. देवासाठी, धर्मासाठी ,स्वराज्यासाठी आणि राज्यासाठी, स्वतःच्या प्राणांची नैवेद्य अर्पिला.[5]

सरनोबत नेताजी पालकर यांना "प्रति शिवाजी ","महाराजांचा उजवा हात "असे संबोधित असत. पण दुर्दैवाचं फेयामुळे त्यांच्या आयुष्यात काही अंकित अशा घटना घडल्या. नशीब फिरले. देवाचा फासा उलटा पडला. ते निर्दोष असूनही त्यांना शारीरिक व मानसिक यम यातना भोगावे लागल्या. पण त्यातून निसटण्याची योग्य संधी ते दिलेरखाना बरोबर हिंदवी स्वराज्यात चालून येत असताना मिळाली. अन ते सटकले. ते रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांपुढे येऊन उभे राहिले. तब्बल नऊ वर्ष मुसलमान म्हणून काबुल कंधाहारच्या मुसलमानी प्रदेशात व मुगल राजवटीत राहिलेले नेताजी पालकर आज अचानक पुन्हा रायगडावर दाखल झाला. महाराजांनी ममतेने त्याला आपलेसे केले.[6]

**4) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील गुप्तहेर व्यवस्थेतील शिलेदारांची कामगिरी:**

"बहिर्जी नाईक हे शिवकाळातील गुप्तहेर खात्याचे प्रमुख होते. त्यांनी आणि त्यांच्या हेर खात्यांनी शिवकाळात अचाट कामगिरी केली. एवढ्या बलाढ्य मोगल सेनेला तोंड देताना विजयाची अपेक्षा एवढ्या कमी संख्येत असलेल्या मराठ्यांनी करावी हे शक्य नव्हतं. परंतु शिवाजी महाराजांना बहिर्जी यांनी दिलेल्या अचूक माहितीमुळे महाराजांचे प्रत्येक नियोजन यशस्वी झालं. अफजल खान वध असो, शाहिस्तेखानाची बोटे छाटणे असो किंवा आग्र्याहून सुटका असो सगळ्या प्रसंगामध्ये हेर खात्याची उत्तम कामगिरी यामुळे शंभर टक्के यश मिळाले.[7]

"महाराज पन्हाळगड्यावर अडकले होते अन मोगलांनी पूर्ण गडाला वेढा घातला होता. बरेच दिवस झाले तरी वेढा सैल झाला नाही. याही वेळी महाराजांना पन्हाळगडावरून सुखरूप बाहेर पडण्यासाठी गुप्तहेर खात्याचे योगदान महत्वपूर्ण होते. बहिर्जी आणि त्यांचे हेर गुप्तपणे वावरत असत. त्यामुळे त्यांच्या हयातीत त्यांना ते हेर आहेत, असे कोणीही ओळखू शकले नाहीत. त्यामुळेच या हेराबद्दल कुठे कुठे थोडीफार माहिति मिळते .[8]

"बहिर्जी नाईक यांना शिवाजी महाराजांच्या आयुष्यातून वगळता येणार नाही. प्रत्यक्ष रणांगणावर राजे युद्ध खेळ पण बहिर्जी नाईक पडद्यामागे युद्ध खेळले. क्षणोक्षणी स्वतःचा जीव धोक्यात घालून बहिर्जी हे रगिरीचे युद्ध खेळले. म्हणून राजांना एवढ्या बलाढ्य मोगल शत्रूला नेहमीच गनिमी काव्याने नामोहरम करता आले."[9]

**निष्कर्ष:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कामगिरीचा आढावा घेतला. महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये मुलकी, राज्यकारभारातील, लष्करी, गुप्तहेर खात्यातील शिलेदारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. महाराष्ट्रातील विखुरलेल्या मराठ्यांसमोर महाराजांनी स्वराज्याची कल्पना मांडली. आणि ती प्रत्यक्षात उतरवली. शिवाजी महाराजांच्या रूपाने महाराष्ट्राला अद्वितीय नेतृत्व लाभले. आणि मराठ्यांचे स्वप्न साकार झाले. यासंदर्भात नामवंत इतिहासकार सेतू माधवराव पगडी यांचे मत निश्चित लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, "आत्म सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगण्याचा नवीनच मार्ग शिवाजी महाराजांनी शोधून काढला. राष्ट्रीय भावना जागृत करण्याचे, लोकांमध्ये एकी निर्माण करण्याचे, आणि स्वराज्याची स्थापना करण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले. ते कार्य अन्य कोणालाही जमण्यासारखे नव्हते." न.र. फाटक यांनीही वरील मताला पुष्टी दिलेली आढळते. "शिवाजी महाराज सारखे नेतृत्व स्वतंत्र आणि स्वयंभू होते. त्यांचे नेतृत्व इतर कोणालाही जमण्यासारखे नव्हते." छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील शिलेदारांच्या कामगिरीचा ज्ञातं, अज्ञात इतिहास माहिती करून घेणे यातून महाराजांचे शिलेदारांचे कार्य अद्वितीय स्वरूपाचे होते असा निष्कर्ष निघतो. महाराजांचे खूप मोठे योगदान आहे असे आपणास दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ:**

1) शिलेदार संकल्पना गुगल इंटरनेट.
2) मराठ्यांचा इतिहास श.गो.कोलारकर चतुर्थ आवृत्ती 1995, श्री मंगेश प्रकाशन नागपूर पृष्ठ क्रमांक 23.
3) शिवरायांचे शिलेदार प्रतापराव गुजर वरदा प्रकाशन पुणे पृष्ठ क्रमांक 15.
4.) मराठ्यांचा इतिहास प्रा.डॉ. श.गो.कोलारकर चतुर्थावृत्ती 1995, श्री मंगेश प्रकाशन नागपूर पृष्ठ क्रमांक 113.
5) शिवरायांचे शिलेदार, नेताजी पालकर, प्रभाकर भावे वरदा प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रमांक 5, 6.
6) ऑनलाइन दैनिक लोकमत 6 मार्च 2018.
7) शिवरायांचे शिलेदार गुप्तहेर, बहिर्जी नाईक, मीनाक्षी वैद्य, वरदा प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रमांक1.
8) ऑनलाइन दैनिक लोकसत्ता ३० डिसेंबर २००८.
9) शिवरायांचे शिलेदार, गुप्तहेर बहिर्जी नाईक, मीनाक्षी वैद्य, वरदा प्रकाशन पुणे, पृष्ठ क्रमांक 94, 95.